MAHBIL03429/13/1/2000-TC खाजगी वितरणासाठी वर्ष: नववे । अंक: चौथा । ऑगस्ट, २००९

# CIDCO Nirmiti
A NEWSLETTER



02 CIDCO's participation in the first 'Habitat Business Forum' launched by FICCI


03 Employment in Service Sector in Navi Mumbai: Government & Private Offices


05 सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी


07 सिडको एम्प्लॉईज युनियनतर्फे राशीचक्रचे यशस्वी आयोजन


## सिडको संचालक मंडळासमक्ष साडेबारा टक्के भूखंड वाटपाची रबाळे-गोठीवली येथील संगणकीय सोडत संपन्न

नवी मुंबईच्या रबाळे-गोठीवली येथील भूमीपुत्रांसाठी १२.५टक्के योजनेअंतर्गत भूखंड वाटपाची संगणकीय सोडत सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. नकुल पाटील** यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडको संचालक मंडळासमक्ष मंगळवार, **दिनांक १४ जुलै, २००९** रोजी 'निर्मल', नरिमनपॉईट, मुंबई ४०००२१ येथे पार पडली.

या सोडतीद्वारे ३९२५ चौ.मी. क्षेत्राचे वाटप प्रकल्पग्रस्तांना करण्यात आले. या अंतर्गत रबाळे- गोठीवली येथील ११ भूखंडांचे वाटप करण्यात आले.

प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी १२.५ टक्के योजने अंतर्गत भूखंड वाटपाच्या संगणकीय सोडती संचालक मंडळासमक्ष काढण्याच्या कृतिशील कार्यवाहीत आतापर्यंत उलवे - ६१.११ हेक्टर, करंजाडे - १०.१६ हेक्टर, द्रोणागिरी - ३८.४९ हेक्टर, उलवे - २.११ हेक्टर, करंजाडे - १०.९७ हेक्टर, द्रोणागिरी - ७.३७ हेक्टर, तळोजा-पाचनंद - २९.८६ हेक्टर, नावडे२ - २.५४ हेक्टर, काळुंद्रे - ०.९७ हेक्टर, उलवे १ डी - २१.९२ हेक्टर, उलवे १डी - १३.०९५ हेक्टर, द्रोणागिरी - ९.१७ हेक्टर तळोजा - १.६४२ हेक्टर, तळोजा ०.५०१, करंजाडे - १.४२ हेक्टर, कामोठे-II - ०.४६६, करंजाडे- २.०२, रोडपाली ४.४८,उलवे २.०७, तळोजा-पाचनंद २.५७, करंजाडे ४.९, द्रोणागिरी २२.६३ हेक्टर, कामोठे आणि कोपरखैरणे १.८८ हेक्टर, द्रोणागिरी आणि उलवे ३३.३४ हेक्टर, रोडपाली-२-५.६४ हेक्टर, कामोठे-II- १.६६ हेक्टर, तळोजा १.२१८ हेक्टर, रबाळे- गोठीवली आणि घणसोली- तळवली ७.०४५ हेक्टर, करंजाडे-४,रबाळे, गोठीवली, कामोठे-II (५) आणि रोडपाली-III-५.०६ हेक्टर, एकूण ३०६.३०७ हेक्टर क्षेत्राचे वाटप करण्यात आले. या सोडतीतील ३९२५ चौ.मी. एवढ्या क्षेत्राच्या समावेशासह, आतापर्यंत या संगणकीय सोडतीद्वारे ३०६.३११ हेक्टर एवढ्या क्षेत्रासाठी संचालक मंडळासमोर सोडती काढण्यात आल्या आहेत.





रबाळे-गोठीवली विभागातील सदर संगणकीय सोडतीला **मा.श्री. नकुल पाटील**, अध्यक्ष, सिडको, **श्री. जी. एस. गिल्ल**, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, **श्री. दिलीप जाधव**, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, **मा.श्री. नामदेव रामा भगत**, संचालक, सिडको, **मा.श्री. सुभाष भोईर**, संचालक, सिडको हे मान्यवर उपस्थित होते.

# CIDCO's participation in the first 'Habitat Business Forum' launched by FICCI

CIDCO participated in the first 'Habitat Business Forum' launched by the Federation of Indian Chambers of Commerce and Industry (FICCI) in partnership with UN-HABITAT, **Shri Ramesh N. Dengle,** Sr. Planner – CIDCO, **Shri Ashitosh Nikhade,** Dy. Planner – CIDCO, along with the other delegates from different countries. the country. The presentation was well-received and appreciated by the audience. After the presentation, Shri Dengle addressed the Q & A session.




Ministry of Housing and Urban Poverty Alleviation, Government of India and China Real Estate Chamber of Commerce (CREC). The Forum was held between 7th July and 9th July, 2009 at Vigyan Bhavan, New Delhi. The Habitat Business Forum provides an international platform to private sector companies and their partners to debate urban challenges and solutions, and showcase best practices and innovation for creating sustainable and harmonious cities. It was attended by **Shri G. S. Gill,** Vice Chairman & MD – CIDCO,

Shri. Gill made a presentation on Navi Mumbai and its salient features. The VC & MD explained the objectives behind the formation of Navi Mumbai and how CIDCO's innovative planning and development strategies helped in establishing Navi Mumbai and setting it on the path to become one of the premier cities of



# Employment in Service Sector in Navi Mumbai: Government & Private Offices

A census of the 'Employment in Service Sector in Navi Mumbai: Government & Private Offices' was conducted by the Statistics Department of CIDCO with the broad objective of assessing the number and type of offices by their location, ownership status, year of establishment, monthly rent, number of employees by type of offices, gender-wise employment, socio-demographic and economic profiles of white-collar workforce, residential location of employees and their place of origin, level of satisfaction of employee with infrastructure facilities in Navi Mumbai and the main mode of transport used by employees to commute to their workplace.




**A brief summary of the findings:** The findings of the present report are derived from the Census of Government (including Semi-Government, Public) and Private Office sector including IT sector in Navi Mumbai, located in 14 nodes and 95 villages, Panvel and Uran Municipal councils and MIDC area, which was undertaken during 2007-2008.

**Ms. Rita Abbi,** Sr. Statistician - CIDCO, under whose supervision the census was undertaken, states that "Total 10,856 offices were surveyed and the socio-economic profile of 1,51,122 employees was compiled in Navi Mumbai. Out of the total offices, 4% belong to the government, 7% to the IT sector and the remaining 89% are private offices. The highest percentage (45%) of employees is in the IT sector followed by other offices in the private sector (38%), while the lowest (17%) is in the government sector."

From the report, it is clearly evident that the average number of employees is highest (95) in the IT sector. While the average number of employee per unit in private offices is lowest (6), in government offices, the average number is 58.

Out of all types of offices, 53% are owned and 47% are rented. It was also observed that ownership of office premises is highest in government offices as compared to private offices.




CIDCO's Joint Managing Director - **Shri D. G. Jadhav,** IAS, points out that "Though, today, there are 10,856 offices in Navi Mumbai, only 10% of offices were established up to 1990. However, after 1991, the growth of offices witnessed an upward trend and a phenomenal increase (62% in private offices and 78% in IT and BPOs) in the last 7 years. Adding further, he states that India's Service sector has been growing at an annual growth rate of about 28% during the last 5 years. It provides employment to 28% of the workforce and has the largest share in the GDP, accounting for 55% in 2007."




The percentage distribution of the 10,856 offices reveals that Vashi node has the highest percentage (36.7%) of offices; while the second highest percentage (11.9%) is in CBD Belapur (with most of the government offices). While the percentage of offices in Airoli, Koparkhairne,




Sanpada, Nerul, Kharghar, Kalamboli, New Panvel, MIDC area and PMC range from 3% to 7%, the lowest percentage (0.8%) of offices is in the Uran Municipal Council.

The study shows that the percentage of males is highest in private offices (85%) followed by government offices (82%). The IT sector constitutes 68% of male and 32% of female workforce.

The study reveals that while two third of the workforce is in the age group of 18-30 years, only 7% belong to the 40 years and above bracket, and about one fifth

of the employees belong to age group of 18-20 years.




It is observed that more than two third of the employees (69%) are graduates and above, which includes professionals and postgraduates in various disciplines. While 16% of the workforce has passed higher secondary, only 9% has completed




SSC. However, only a negligible percentage (0.2%) of workforce is illiterate.

The distribution of employees by profession indicates that around 50% of the employees are in technical category, whereas the remaining 50% employees belong to four categories namely, (i) semi-technical (23%) (ii) executive/supervisory (21%) (iii) professional (5%) and (iv) others (2%).

The percentage of employees was highest (61%) in the Permanent category. More than one third (36%) employees were on a Temporary basis and a very small percentage (3%) of employees was on Contract basis.




The monthly income status of the employees throws light on the fact that a large proportion (36.47%) of employees earn a monthly income of up to Rs. 10,000/-. The majority (35.7%) of office employees, however, have a monthly income between Rs. 10,001/- and Rs. 20,000/- and the rest 17.93% are found in a monthly income bracket of Rs. 20,001/- to Rs. 30,000/-; 6.35% earn a monthly income between Rs. 30,001/- and Rs. 50,000; 3.15% earn between Rs. 50,001/- and Rs. 75,001/- monthly and 0.19% have a monthly income between Rs. 75,001/- and Rs. 1,00,000/-. However, only a tiny proportion (0.1%) is getting between Rs. 1.5 lac and Rs 5 lac and above.




The average monthly income of the employees of government offices is found lowest (Rs. 15,585/-), whereas the employees in private offices have a slightly higher average monthly income (Rs. 15,686/-). As expected, the average monthly income of all those engaged in IT and BPOs is much higher (Rs. 25,193/-) than those working in other private offices.

Senior Consultant **Prof. P. C. Saxena** - Garware Chair Professor, Tata Institute of Social Sciences (TISS), Mumbai, who has written the present report, mentions "Out of the total employees, 80% reside in different nodes and villages (which also include the Panvel and Uran Municipal Councils) of Navi Mumbai. While 11% of the employees come from Mumbai to work in Navi Mumbai, 9% come from Mumbai Metropolitan Region (MMR) like Thane, Kalyan, Dombivli and other areas. Four-fifth of the employees are working as well as residing in Navi Mumbai. The majority (33%) of the employees commute by local train followed by those who travel by bus (32%). All those who walk down to their offices constitute 20% of the total office employees. The company car or their own car is used by only 6% of the employees. Motorcycle and two-wheeler is the main mode of transport for 8% of the employees, whereas only 1% use bicycle."

4

The majority (71%) of office employees are from Maharashtra state followed by northern states (17%) and southern states (9%). Only 2% of employees have come from the eastern region and 0.4% from other countries.

Regarding the level of satisfaction about 10 infrastructure facilities in Navi Mumbai including roads, water, electricity, pollution, security, overall cleanliness, health, parking, garbage disposal, and transport, it was observed that more than four-fifth of the employees were satisfied with roads, parking, security, garbage disposal, water, transport and overall cleanliness. Where 80% employees were satisfied with health facilities in Navi Mumbai, 78% were



satisfied with electricity and level of pollution in the atmosphere.

In all of the urban cities, the Service sector constitutes more than half of the urban workforce. Today majority of employment is in the Service sector. Mumbai has a high rate of employees (81%) in the general Service sector. This includes communication, social and personal service. Summing up the report, **Shri G. S. Gill,** Vice Chairman and Managing Director - CIDCO, adds that "The main contributing factors to the economy have been the Commodity Market including wholesale (33%); Office Sector (22%); Health and Education Sectors (4%) in Navi Mumbai. The Service sector has been a prime growth driver, contributing nearly 60% share of employment in Navi Mumbai. From the data thus gathered it might be possible to find the spatial distribution of type of jobs in the Government and Private sector including IT and BPOs. This in turn may help planners to locate the nodes where Service sector jobs are lacking, so that more jobs can be created to have even distribution in those areas. The baseline information, thus, may be used for effective planning to create jobs in the years to come."

## कोकणभूमी प्रतिष्ठान आयोजित चर्चासत्रात सिडकोचा सहभाग

**दि. १९ जुलै २००९ रोजी** कोकण भूमी प्रतिष्ठानच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृह येथे आयोजित चर्चासत्रात सिडकोच्या विविध प्रकल्पांचे यशस्वी सादरीकरण करण्यात आले.

या चर्चासत्रात सिडकोचे वरिष्ठ नियोजनकार **श्री. रमेश एन. डेंगळे** आणि जनसंपर्क अधिकारी व **डॉ. मोहन निनावे** यांची उपस्थिती लाभली.

या प्रसंगी सिडकोच्या विविध प्रकल्पाबद्दल माहिती देण्यात आली, ज्यात प्रामुख्याने पायाभूत सोयी-सुविधा, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, पर्यावरण आणि नवी मुंबईत आगामी काळात विकसित होत असलेले विशेष प्रकल्प यांचा समावेश होता. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मुख्यालयाचा प्रकल्प हा कोकणातील सिडकोने राबवलेला महत्वपूर्ण प्रकल्प. सादरीकरणाद्वारे त्याची विस्तृत माहिती देण्यात आली.



वरिष्ठ नियोजनकार श्री. रमेश डेंगळे यांनी सिडकोचे महत्वपूर्ण व आगामी प्रकल्पांचे अतिशय ओघवते सादरीकरण उपस्थितांपुढे केले. विशेषत्वाने दिवंगत श्री. कानविंदे यांनी कोकणातील भूमीच्या नागरी विकासासाठी कोकणच्या निसर्गाशी प्रामाणिक राहून केलेल्या सर्वांगिण विकास आराखड्यापासून ते वरच्या कोकणातील नवी मुंबईच्या आजवर केलेल्या व भविष्यात करावयाच्या विकास योजनांचा या सादरीकरणात समावेश होता.

## सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी

सिडको कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन, प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची प्रक्रीया सुरू केली असून याकरीता व्यवस्थापक कार्मिक **श्री. डी. ए. करंदिकर** यांच्या नेतृत्वाखाली विशेष तुकडीचे गठन करण्यात आले असून ही चमू सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीची प्रक्रिया अतिशय चोखरित्या व परिश्रमपूर्वक पार पाडत आहेत. या तुकडीत खालील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.





**सौ. एम.एम. कर्णिक** (कार्मिक अधिकारी), **श्री. एम. जी. जाधव** (कार्मिक अधिकारी (आस्था)), **श्री. प्रदिप. ए. म्हात्रे** (सहाय्यक कार्मिक अधिकारी (भरती)), **श्री. अशोक एम. ठाकूर** (सहाय्यक लेखा अधिकारी), **श्री. प्रफूल एस. आळतेकर** (ए.डी.ओ. (कॉम्प्यूटर)), **श्री. व्ही. एस. खरे** (सहाय्यक विकास अधिकारी पुनर्वसन), **श्री. दिपक प्र. मडके** (सहाय्यक अभियंता), **सौ. एम. एम. खरे** (क्षेत्राधिकारी), **श्री. लवेश एस. चव्हाण** (लेखापाल), **सौ. मोहिनी अे. पडते** (लेखापाल), **श्री. बी. पी. भोपी** (वरीष्ठ लेखा सहाय्यक), **श्री. पी. वी. कडू** (कार्यालयीन सहाय्यक), **सौ. पी. बी. साबळे** (कार्यालयीन सहाय्यक), **सौ. एस. बी. चिरलेकर** (कार्यालयीन सहाय्यक), **सौ. एन. पी. मुंज** (कार्यालयीन सहाय्यक), **श्री. अनंत देशमुख** (कार्यालयीन सहाय्यक), **सौ. रेश्मा पाटील** (टंकलिपिका), **श्रीमती वसुधा लेले** (टंकलिपिका), **कु. वैशाली कोळी** (टंकलिपिका), **सौ. छाया पाटील** (टंकलिपिका), **श्री. विजिन वामनन** (टंकलिपिक), **श्री. सुनिल बी. कदम** (लेखा सहाय्यक), **श्री. एम. एम. आंग्रे** (लेखा सहाय्यक), **श्री. मारूती बा. पाटील** (लेखा लिपिक), **श्री. सुनित ज. म्हात्रे** (लेखा लिपिक) व **श्री. मंगेश का. हाडकर** (लेखा लिपिक), **श्री. रासम रविंद्र** (शिपाई), **श्री. पालव जयराम** (शिपाई), **श्रीमती सिताबाई बनसोडे** (शिपाई), **श्री. परब सदानंद** (शिपाई).

नवीन वेतनश्रेणीनुसार ऑगस्ट महिन्याचे वेतन सर्वांस मिळावे याकरिता ही तुकडी परिश्रम घेत आहे.

# सिडको कर्मचारी संघटनेची निवडणुक: प्रगती पॅनल बहुमताने विजयी

सिडको कर्मचारी संघटनेच्या **दि. १६ जुलै २००९ रोजी** झालेल्या निवडणूकीत प्रगती पॅनलच्या उमेदवारांचा बहुमताने विजय झाला. २४ पदांसाठी एकूण ४९ उमेदवारांनी निवडणूकीत उमेदवारी जाहीर केली होती. जाहीर झालेला निवडणूकीचा कार्यक्रम योग्यरित्या पार पाडण्याकरिता **श्री. जगदीश शिवराम मुकादम,** मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी, श्री. अनिल वसंत संख्ये, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, श्री. महेंद्र रामचंद्र भोईर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, श्री. शेखर जगन्नाथ पाटील, खजिनदार, श्री. महादेव काशीनाथ कोळी, सभासद, श्री. रमेश केशव उपाध्ये, सभासद, श्री. राजेंद्र पांडुरंग तवले, सभासद, श्री. राजेंद्र विष्णू आटवणे, सभासद, श्री. संतोष शंकर पळशीकर, सभासद, श्री. सुनिल शांताराम वाघमारे, सभासद, श्री. विकास महादू म्हात्रे, सभासद, श्री. रमेश तुकाराम कोळी, सभासद आणि श्री. संजीवन नारायण पाटील, सभासद, यांनी निवडणूक अधिकारी म्हणून परिश्रम घेतले. या निवडणूकीत विजयी झालेल्या विविध पदाधिकाऱ्यांमध्ये खालील उमेदवारांचा समावेश आहे.



| | | |
|---|---|---|
| **श्री. निलेश अ. तांडेल** | – | अध्यक्ष |
| **श्री. विनोद पी. पाटील** | – | उपाध्यक्ष |
| **श्री. मोहन एन. भोईर** | – | उपाध्यक्ष |
| **श्री. मिलिंद डी. बागुल** | – | सरचिटणीस |
| **श्री. जनार्दन टी. पाटील** | – | चिटणीस |
| **श्री. हितेंद्र एस. घरत** | – | सहचिटणीस |
| **श्री. सुर्यकांत ऐ. ठाकूर** | – | सहचिटणीस |
| **श्री. संजय आर. पाटील** | – | सहचिटणीस |
| **श्री. अनिल जे. भातणकर** | – | खजिनदार |
| **श्री. बाळाराम डी. ठाकूर** | – | सभासद |
| **श्रीमती. मिनाक्षी तांडेल** | – | सभासद |
| **श्री. प्रभाकर एन. पाटील** | – | सभासद |
| **श्री. गणेश एम. कोळी** | – | सभासद |
| **श्री. नरेंद्र एम. हिरे** | – | सभासद |
| **श्री. चंद्रकांत के. घरत** | – | सभासद |
| **श्री. हरिष एन. पाटील** | – | सभासद |
| **श्री. नितिन एस. कांबळे** | – | सभासद |
| **श्री. महादेव डी. कोळी** | – | सभासद |
| **श्री. ज्ञानेश्वर एस. भोईर** | – | सभासद |
| **श्रीमती विजया पी. म्हात्रे** | – | सभासद |
| **श्री. श्रीकृष्णा एन. पाटील** | – | सभासद |
| **श्री. रघुनाथ एन. पाटील** | – | सभासद |
| **श्री. मनोहर एल. चौधरी** | – | सभासद |
| **श्री. पदु अक्का भगत** | – | सभासद |

विजयी झालेल्या नूतन संघटनेच्या वतीने गुरूवार दि. २३ जुलै २००९ रोजी सिडको सभागृहात आभार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना नवनियुक्त अध्यक्ष श्री. निलेश तांडेल यांनी कर्मचाऱ्यांनी आमच्यावर पुन:श्च टाकलेल्या विश्वासाच्या कसोटीवर पुन्हा निश्चितच उतरू असा विश्वास व्यक्त केला. संघटनेचे नवनियुक्त सरचिटणीस श्री. मिलिंद बागुल यांनी कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आदर व्यक्त करून या पुढेही कर्मचाऱ्यांच्या हितासाठी असेच तत्पर राहू अशी ग्वाही दिली.










# सिडको बी.सी. एम्प्लॉईज असोसिएशनतर्फे नूतन सिडको कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा जाहीर सत्कार

सिडको बी.सी. एम्प्लॉईज असोसिएशनतर्फे सिडको कर्मचारी संघटनेच्या नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांचा जाहीर सत्कार समारंभ **बुधवार, दिनांक २९ जुलै, २००९ रोजी** सिडको भवन, सातवा मजला येथील सभागृहात संपन्न झाला.

या कार्यक्रमप्रसंगी सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष **श्री. निलेश तांडेल**, सरचिटणीस **श्री. मिलींद बागुल** आणि **श्री. विनोद पाटील** यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या जाहीर सत्कार समारंभप्रसंगी सिडको कर्मचारी संघटनेचे निर्वाचित पदाधिकारी आणि सदस्यांचा सिडको मागासवर्गीय कर्मचारी संघटनेच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी पुष्पगुच्छ आणि **भारतीय संविधानाची प्रत** देऊन त्यांचा सत्कार केला. या प्रसंगी काव्यवाचनाचेही आयोजन करण्यात आले होते त्यात कवी **प्रा. श्री. प्रशांत मोरे, श्री. साहेबराव ठाणगे, श्री. पुंडलिक म्हात्रे, श्री. मोहन भोईर** आणि गझलकार **श्री. मनोहर रणपिसे** यांनी आपल्या







श्रवणीय रचना सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिडको कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष **श्री. मोहन भोईर** यांनी केले तर आभार प्रदर्शन **श्री. नरेंद्र हिरे** यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता **श्री. संतोष उरणकर, श्री. दत्ता झाल्टे, सौ. सुमन कोलगे, सौ. सविता शिंदे, सौ. योगिता चव्हाण, श्री. विक्रम गायकवाड** यांनी परिश्रम घेतले.



# सिडको एम्प्लॉईज युनियनतर्फे 'राशीचक्र' आणि 'श्रावणधारा' कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन





नूतन कर्मचारी संघटनेने कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त करण्याकरीता विष्णूदास भावे नाट्यगृहात आभार सोहळ्याचे आयोजन केले होते. या प्रसंगी **शरद उपाध्ये** यांच्या 'राशीचक्र' या सदाबहार एकपात्री प्रयोगाचे आयोजन करण्यात आले. या एकपात्री प्रयोगाच्या आयोजनाविषयी सांगतांना सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष **श्री. निलेश तांडेल** म्हणाले की, कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून या हसऱ्या-खेळकर प्रयोगाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमांना अधिकारी व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. राशीचक्राच्या प्रयोगाचा आस्वाद सिडकोच्या सर्वच अधिकारी कर्मचाऱ्यांना न घेता आल्यामुळे दि. ७ ऑगस्ट २००९ रोजी 'श्रावणधारा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्रातील नामवंत कलाकारांच्या सुमधूर मराठी गीतांचे गायन व पावसाळी कविताचे काव्यवाचन करण्यात आले. समस्त श्रोत्यांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आस्वाद घेतला. सिडकोच्या नवनियुक्त संघटनेने मनोरंजनाच्या या नव्या माध्यमाचा जो पायंडा सुरु केला त्याचे सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून स्वागत करण्यात आले.







## 'वनौषधी आपल्या घरात, आपल्या दारात' पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

सिडकोचे सहाय्यक उद्यान अधिकारी **श्री. श्रीकांत बा. कर्वे** यांच्या अत्यंत उपयुक्त व अतिशय मौल्यवान अशा वैद्यकीय माहितीचा संग्रह असलेल्या **'वनौषधी आपल्या घरात, आपल्या दारात'** या पुस्तकाचे प्रकाशन **दि. ४ ऑगस्ट २००९ रोजी** संपन्न झाले.

डॉ. भक्तिकुमार दवे, डॉ. मधुकर आपटे, डॉ. अशोक गोडबोले, श्री. जयंत वझे व श्री. प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष पनवेल यांच्या प्रमुख उपस्थितित या पुस्तकाचे प्रकाशन पार पडले. बालपणापासून औषधी वनस्पतींच्या माहितीची जिज्ञासा असलेल्या श्री. कर्वे यांनी आपल्या अनोख्या ज्ञानाचे संचित पुढच्या पिढीला सूपूर्द केले आहे. २४० पृष्ठ संख्या व २०० रु. किंमत असणारे हे पुस्तक प्रत्येक घरात एक हुकुमी वैद्य ठरेल असे आहे. श्री. श्रीकांत बा. कर्वे यांना त्यांच्या पुढच्या लेखन प्रवासास सिडको परिवाराच्या शुभेच्छा.



## पदोन्नती

सिडको महामंडळात जुलै २००९ मध्ये पुढील कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदोन्नती व नियुक्ती देण्यात आली आहे.

### पदोन्नती

◆ अतिरिक्त मुख्य वास्तुशास्त्रज्ञ: **श्रीमती एस. व्ही. अवटी** ◆ अतिरिक्त मुख्य अभियंता: **श्री. बी. बी. मेहता** ◆ अधिक्षक अभियंता (दूरसंचार): **एन. पी. देशपांडे.** ◆ कार्यकारी अभियंता: **श्री. के. ओ. चौधरी** ◆ लेखा अधिकारी: **श्री. एन. आर. इराशेट्टी** ◆ सहयोगी नियोजनकार: **श्री. ए. व्ही. वुईके** ◆ सहाय्यक कार्यकारी अभियंता: **एस. एस. औताडे** ◆ लिपिक: **एस. एन. कोळी.**

### नियुक्ती

सांख्यिकी: **डॉ. एल. एस. शेख.**

पदोन्नती प्राप्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सिडको परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन !

## श्रद्धांजली

सिडको महामंडळातील शिपाई (अभियांत्रिकी विभाग) या पदावर कार्यरत **श्री. जनार्दन गणपत पाटील** यांचे शनिवार दि. ४ जुलै,



२००९ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी **गुरूवार दि. ९ जुलै २००९ रोजी** दुपारी १२:३० वा. शोकसभा सिडको भवन प्रवेशद्वाराजवळ आयोजित करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## निरोप समारंभ

**श्री. विनायक दत्ताराम जोशी** (सहाय्यक लेखा अधिकारी) व **श्री. अभिमन्यू गणपत घरत** (फायरमन) हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर **३१ जुलै, २००९ रोजी** निवृत्त झाले. प्रशासनातर्फे त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.



**श्री. अभिमन्यू गणपत घरत**

या प्रसंगी भविष्य निर्वाह निधी, इतर सामाईक रकमांचे धनादेश, भेटवस्तू, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या निरोप समारंभा प्रसंगी सिडको कर्मचारी संघटना, बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन, इंजिनियर्स असोसिएशन, ऑफिसर्स असोसिएशन व सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संपादक, मुद्रक व प्रकाशक: डॉ मोहन निनावे, जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी सिडको लिमिटेड करीता ही गृहपत्रिका इन-हाऊस स्टुडिओ, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र-मार्फत छापून सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, महाराष्ट्र-येथे प्रकाशित केली. (खाजगी वितरणासाठी).
या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी सिडको व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.